दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २८१ वा बुधवार दि.१७ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# लातूर लोकसभा मतदारसंघात पाच नामनिर्देशनपत्र दाखल







लातूर : – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ४१-लातूर लोकसभा मतदारसंघात मंगळवार, १६ एप्रिल २०२४ रोजी तीन उमेदवारांनी पाच नामनिर्देशनपत्रे दाखल केली. तसेच १२ व्यक्तींनी १७ नामनिर्देशनपत्रे प्राप्त करून घेतली. लातूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडे सुधाकर तुकाराम शृंगारे (भारतीय जनता पार्टी) यांनी एक, श्रीधर लिंबाजी कसबेकर (राष्ट्रीय संत संदेश पक्ष) यांनी तीन, सुरेश दिगंबर कांबळे (अपक्ष) यांनी एक असे एकूण पाच नामनिर्देशनपत्रे १६ एप्रिल रोजी दाखल केले. आतापर्यंत दाखल झालेल्या एकूण नामनिर्देशनपत्रांची संख्या ६ झाली असून आतापर्यंत एकूण ५६ व्यक्तींनी १०७ नामनिर्देशनपत्रे प्राप्त करून घेतली आहेत.

## समाजातील भीतीचे वातावरण दूर करण्यासाठी डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून द्यावे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

लातूर / प्रतिनिधी : देशातील सामान्य माणसाला दुःखातून बाहेर काढण्यासाठी, समाजातील भीतीचे वातावरण दूर करण्यासाठी, शेतमालाला हमीभाव देण्यासाठी, महागाई भरमसाठ वाढली ती कमी करण्यासाठी, उच्चशिक्षण घेऊन देखील बेरोजगार असलेल्यायुवकांना रोजगार देण्यासाठी, महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी,कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे, ती सुधारण्यासाठी, मनरेगा अंतर्गत हाताला काम मिळावे यासाठी आपण डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून द्यावे, असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा मतदारांशी परिचय व्हावा यासाठी गेल्या कांही दिवसापासून लातुर लोकसभा मतदारसंघात सुसंवाद बैठका घेतल्या जात आहेत.लातुर विधानसभा मतदार संघातील वासनगाव येथे सोमवार दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी रमेश थोरमोटे पाटील यांच्या निवासस्थानी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संवाद बैठक घेण्यात आली यावेळी ते बोलत होते. या बैठकीला वासनगावसह परिसरातील जेष्ठ नागरिक, युवक उपस्थित होते. यावेळी पूढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातुर लोकसभा निवडणुक २०२४ निमित्ताने आपण वासनगाव याठिकाणी डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ आपण एकमेकांशी संवाद साधण्यासाठी एकत्र आलेलो आहोत. वासनगाव हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला असून आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या हृदयाजवळील हे गाव असून या ठिकाणी आल्यानंतर आपल्या घरी असल्याचे वाटते असे सांगीतले. यावेळी पूढे बोलतांना म्हणाले, लातुर लोकसभेचे तत्कालीन खासदार मतदार संघात सोडा, सभागृहात तरी कधी आले की नाही? कधी सर्वसामान्यांचे प्रश्न मांडले की नाही? अशी शंकाच आहे. सदया आपल्याला सामान्य माणसाला दुःखातून बाहेर काढण्यासाठी, भीतीचे वातावरण दूर करण्यासाठी, शेतमालाला भाव देण्यासाठी, महागाई भरमसाठ वाढली ती कमी करण्यासाठी, उच्चशिक्षण घेऊन देखील बेरोजगार असलेल्या युवकांना रोजगार देण्यासाठी, महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी, कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे, ती सुधारण्यासाठी, मनरेगा अंतर्गत हाताला काम मिळावे यासाठी आपण डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. आज देशात आणि राज्यात काय सुरू आहे हे आपण पाहत आहोत.प्रत्येक भारतीयांच्या मनात भीती आहे आणि सरकार केवळ भूल थापा देण्यापलीकडे काहीच करीत नाही. सोयाबीनला १० वर्षापूर्वी सरकारने दाम दुप्पट करण्यात येणार असे आश्वासन दिले आज सोयाबीनचे भाव वाढणे तर दुर उलट कमी झाले असे सांगीतले. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, मागील काळात आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख साहेबांनी जे विचार दिले यावर आपले लातुर घडले. यापुढे देखील लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्याला काँग्रेस पक्षाच्या पाठिशी उभे राहावे लागेल. आम्ही तर आहोत आमच्या सोबत म्हणजे आमदार आणि खासदार असे डबल इंजिन लातूरच्या विकासासाठी असल्यास लातुरचा विकास आणखीन झपाट्याने होईल यासाठी आपण बाकीच्या चर्चा अधिक करण्या ऐवजी आपली व आपले उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांची चर्चा करावी, विरोधी पक्षा पेक्षा आपला उमेदवार किती चांगला आहे याची माहिती प्रत्येक मतदाराला द्यावी असे आवाहन त्यांनी केले.

गावच्या विकासनीधीसाठी लोकसभेचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे यावेळी प्रस्ताविक करताना सोनाली थोरमोटे पाटील म्हणाल्या की, आपले लोकसभेचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ ही बैठक होत असून माजी मंत्री आमदार अमित देशमुख साहेबांच्या सहकार्याने गेल्या कांही वर्षात आपल्या गावाला केवळ स्थानिक आमदार निधी मिळाला आणि गावचा सर्व बाजूने विकास झाला. पण तत्कालीन खासदारांनी कुठलाही निधी आजतागायत वासनगावाला दिला नाही. त्यामुळे आपण सर्वांनी महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे अशी उपस्थित ग्रामस्थांना विनंती केली. यावेळी निरीक्षक सर्जे राव मोरे, तालुकाध्यक्ष सुभाष घोडके, तात्यासाहेब देशमुख, श्रीकृष्ण पाटील, रमेश थोरमोटे पाटील, सतीश कानडे, लक्ष्मण मारडकर, हरिभाऊ घोगरे, भूजंग जाधव, भागवत साळुंके, नामदेव मारडकर, विठ्ठल डुरे, रघुनाथ मस्के, विठ्ठल पाटील, रावसाहेब जाधव, सुखदेव पाटील यांच्यासह वासनगाव परिसरातील जेष्ठ नागरिक, ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी या बैठकीला उपस्थित सर्वांचे आभार गोविंद डुरे पाटील यांनी मानले.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची स्वस्त धान्य दुकानदार संघटना लातूर शिष्टमंडळाने घेतली भेट



लातुर प्रतिनिधी : – राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची मंगळवार दि. १६ एप्रिल रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी स्वस्त धान्य दुकानदार संघटना लातूर शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी स्वस्त धान्य दुकानदार यांचे सर्व प्रश्न सोडवले जातील, त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणावे असे आवाहन केले.यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंके, स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष सुधाकर पाटील, सचिव कुमार पाटील, मौला पटेल, राजू पाटील, इंद्रजीत यादगिरे, महेश कोळे, मुजाहेद देशमुख, ताज पटेल, अमोल जाधव, संतोष धुमाळ, तुषार माकणे, संतोष चव्हाण, मंगेश चव्हाण आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## शिवसेना जिल्हाप्रमुख माने यांच्या शिरुर अनंतपाळ तालुक्यात बैठका



निलंगा/प्रतिनिधी : शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा महायुतीचे उमदेवार खा. सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ शिरूर अनंतपाळ तालुक्यातील प्रमुख पदाधिकार्यांची बैठक घेतली. या बैठकीमध्ये जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी होऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकी संदर्भात मार्गदर्शन केले. राज्याचे मुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रामध्ये ४५ पेक्षा अधिकचा नारा दिला आहे. त्यामध्ये आपल्या लोकसभेचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना प्रचंड बहुमताने निवडून आणण्यासाठी आपण सर्वांनी झोकून कामाला लागावे. पंतप्रधानपदी पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना निवडुन आणण्यासाठी शिवसेनेचा सिंहाचा वाटा असावा असे आवाहन केले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अपेक्षित असणारी ८० टक्के समाजसेवा २० टक्के राजकारण करून सर्वसामान्य माणसाची सेवा केली पाहिजे. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी सुशिक्षित बेरोजगार महिला यांच्या प्रश्नाला वाचा फोडून त्यांची मने जिंकल्यास कुठल्याही निवडणुकीला सामोरे गेलो तर आपण निवडून येवू असा आत्मविश्वास माने यांनी व्यक्त केला. यावेळी तालुका प्रमुख विकास शिंदे, शहर प्रमुख विनोद धुमाळे, युवा सेना तालुकाप्रमुख धनराज माने, सुधाकर माडे, मन्मत सुगावे, सचिन गुरमे, महादेव सुरवसे, राम प्रभू, निखिल मोहिते, जगदीश सूर्यवंशी, राजू पवार, कोंडराव पाटील, प्रदीप बानाटे, सुनील कोरे, धनाजी बाबर, बाळू अग्राळे, प्रकाश माने, शिवसेनेसह महायुतीचे सर्व पदाधिकारी, बूथ प्रमुख, शिवदूत उपस्थित होते.

## भाजपा जाहीरनामा म्हणजे विकासाचे अधिष्ठान आ. संभाजी पाटील निलंगेकर



लातूर/प्रतिनिधी : भाजपाने २०१९ च्या निवडणुकीत जो जाहीरनामा प्रकाशित केला होता त्यातील सर्वच संकल्पांची पुर्तता करण्यात आली आहे. विकासाचे घोषणापत्र पुर्ण झाल्याचा अनुभव जनतेला आलेला आहे. त्यामुळेच देशातील जनतेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गॅरंटी असून २०२४ च्या निवडणुकीचे संकल्प पत्र म्हणजे विकासाचे अधिष्ठान आहे, असे मत लातूर लोकसभा संयोजक तथा माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केले. या पत्रकार परिषदेस भाजपा महायुतीचे लातूर मतदारसंघाचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे, आ. रमेशअप्पा कराड, लोकसभा प्रभारी किरण पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, माजी आ. बब्रुवान खंदाडे, प्रदेश प्रवक्त्या प्रेरणा होनराव यांची प्रमुख उपस्थिती होती. भाजपने जाहीर केलेल्या संकल्प पत्रासंदर्भात माहिती देताना आ. निलंगेकर म्हणाले की, भाजपच्या घोषणापत्रामध्ये तरूण, शेतकरी आणि महिलांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. तरुणांसाठी स्टार्टअपला चालना देण्याचे काम केले जाणार आहे. या माध्यमातून मोठ्या संख्येने रोजगार निर्माण होणार आहे. शेतकर्यांसाठी विविध नाविण्यपूर्ण योजना राबविण्यात येणार आहेत. शेतकरी व सरकार यांच्यात थेट संपर्क स्थापित केला जाणार आहे. शेतकर्यांसाठी शेतीला पाणी हा महत्वाचा विषय असून त्या अनुषंगाने काम केले जाणार आहे. शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर अधिक वाढावा यासाठी सरकार काम करणार असल्याचे आ. निलंगेकर यांनी सांगितले. आ. निलंगेकर म्हणाले की, मोदी सरकारने नारी शक्ती कायदा मंजुर केला आहे.यातून महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार आहे. देशातील एक कोटीहून अधिक महिलांना लखपती बनविले जाणार आहे. देशाच्या आर्थिक उलाढालीत आज महिलांचे प्रमाण केवळ १२ टक्के आहे.आगामी पाच वर्षात ते २५ टक्के करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भारत आज जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून महिलांचा सहभाग वाढला तर आपण लवकरच तिसर्या क्रमांकावर पोहोचणार आहोत. देशात मागील दहा वर्षात मुलभूत सुविधांवर मोठे काम झाले आहे. देशात महामार्गांचे जाळे विणले गेले असून आता रेल्वेचे जाळे तयार केले जात आहे. समान नागरी कायदा लागू करण्यासाठी सरकार काम करणार आहे. आ. निलंगेकर यांनी सांगितले की, विकासाचे व्हिजन ठेवून काम करणारा व विचारांचे अधिष्ठान असणारा भाजपा हा एकमेव पक्ष आहे. धर्म व संस्कृती जपण्याचे काम मोदी सरकारने केले असून या संदर्भात ठोस धोरण आखले जाणार आहे. लातूर मतदार संघाबाबत बोलताना आ. निलंगेकर म्हणाले की, मागील दहा वर्षात जिल्ह्यात महामार्गांचे जाळे तयार झाले. रेल्वे कोच प्रकल्प कार्यान्वित झाला. खा. सुधाकर श्रृंगारे यांनी रेल्वेच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा केला. पाच वर्षापूर्वी लातूर येथून केवळ एक रेल्वे धावत होती आज २४ गाड्या लातूर येथून धावतात. आगामी काळात चाकूर येथे रेल्वे जंक्शन स्थापित करण्यासंदर्भात रेल्वेने निर्णय घेतलेला आहे. कोविडसारख्या संकटात केंद्र सरकार लातूरकरांच्या पाठिशी उभे राहिले. त्यातूनच लातूर येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची निर्मीती झाली. समाजातील सर्व घटकांसाठी सरकारने विविध योजनांचा लाभ दिला. आगामी पाच वर्षात पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी व केंद्रीय विद्यापीठ निर्मितीसाठी आम्ही काम करणार आहोत, अशी माहिती आ. निलंगेकर यांनी दिली. खा. सुधाकर श्रृंगारे यांनी मतदार संघात प्रचाराच्या चार फेर्या पूर्ण केल्या आहेत. ३२५ गावांपर्यंत ते पोहोचले असून प्रत्येक गावात पोहोचण्याचा आमचा प्रयत्न आहे. ठिकठिकाणी जनतेचा प्रचंड प्रतिसाद उमेदवार श्रृंगारे यांना मिळत असल्याचेही आ. निलंगेकर यावेळी बोलताना म्हणाले.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### भारतीय नौदलापुढील आव्हाने

हेमंत महाजन, ब्रिगेडियर (निवृत्त) भूमध्य समुद्रातून सुएझ कालव्यामार्गे लाल समुद्र व एडनच्या आखातातून अरबी समुद्र ते हिंद महासागर असा हा विस्तीर्ण आणि व्यापारीदृष्ट्या मोक्याचा जलमार्ग आहे. या समुद्रात ड्रोनविरोधी युद्धाची रणनीती अजूनही पूर्ण विकसित झालेली नाही. हुतींनी निर्माण केलेल्या आव्हानावर मात करण्यासाठी भारताला तांत्रिक सुधारणा आणि कारवाई करताना इतर देशांशी समन्वय जरूरी आहे. भारतासाठी अमेरिकेच्या नेतृत्वाखालील युतीमध्ये सामील होणे, हा एक व्यवहार्य पर्याय आहे.इस्रायल-गाझा संघर्षामध्ये इस्रायलच्या बाजूने आणि हमास-पॅलेस्टाईनच्या बाजूने काही देश व दहशतवादी संघटना खेचल्या गेल्या; मात्र येमेनस्थित हुती बंडखोरांकडून पूर्णपणे वेगळ्या दिशेने हमासच्या समर्थनार्थ इस्रायलविरोधी हल्ले सुरू झाले आहेत. या हल्ल्यांचा रोख लाल समुद्रातील इस्रायली आणि इस्रायल मित्रदेशांच्या व्यापारी जहाजांकडे आहे. क्षेपणास्त्रे आणि ड्रोनच्या माध्यमातून हे हल्ले होत आहेत. हा भारतासाठी मोठा धोका आहे. भारताचा २० टक्के व्यापार लाल समुद्रातून होतो. काही दिवसांपूर्वी या धोक्याची चुणूक दिसून आली. सोमालियाजवळ एका जहाजाचे अपहरण झाले. या जहाजाच्या एकूण २१ क्रू मेंबरपैकी १५ भारतीय होते. अपहरणाची माहिती मिळाल्यानंतर भारतीय नौदलाने, नंतर नौदलाच्या मार्कोस कमांडोंनी क्रू मेंबर्सची सुटका केली.हुतीकडून आलेल्या या क्षेपणास्त्रांपासून रक्षण करण्यासाठी अमेरिका, मित्रदेशांच्या नौदल नौका सक्षम आहेत; परंतु व्यापारी जहाजे आणि मालवाहू टँकरना अशा प्रकारे सुसज्ज सुरक्षा व्यवस्था बाळगता येत नाही. लाल समुद्रातील वाहतूक महत्त्वाची आहे; कारण भूमध्य समुद्रातून सुएझ कालव्यामार्गे लाल समुद्र व एडनच्या आखातातून अरबी समुद्र ते हिंद महासागर असा हा विस्तीर्ण आणि व्यापारीदृष्ट्या मोक्याचा जलमार्ग आहे. काही नौदलांकडे हवेत आणि समुद्रात उडणार्या ड्रोनशी प्रभावीपणे मुकाबला करण्याची साधन व क्षमता आहे. ड्रोन हल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी प्रभावी तंत्रज्ञान म्हणजे 'जॅमिंग' आणि 'स्पूफिंग'; परंतु हे तंत्रज्ञान व्यापारी जहाजांसाठी उपलब्ध नाही. त्यांना हे तंत्रज्ञान देणे सोपे नाही. 'जॅमिंग'मध्ये मैत्रीपूर्ण प्रणालीमध्ये हस्तक्षेप करण्याचीही क्षमता आहे, म्हणजे गैरवापर शक्य आहे.'स्पूफिंग' हे ड्रोन नियंत्रण प्रणालीला गोंधळात टाकण्यासाठी उपयुक्त ठरते; पण हे जहाजाच्या नियंत्रणातही अडथळा आणू शकते. सशस्त्र ड्रोनचा मुकाबला करण्यासाठी लेसर प्रणाली आणि उच्च शक्तीची मायक्रोवेव्ह शस्त्रे यासारखी निर्देशित ऊर्जा शस्त्रे प्रभावी आहेत; परंतु तंत्रज्ञान महाग आहे आणि बहुतेक जहाजांच्या आवाक्याबाहेर आहेत. समुद्रात ड्रोनविरोधी युद्धाची रणनीती अजूनही पूर्ण विकसित झालेली नाही. हुतींच्या आव्हानावर मात करण्यासाठी भारताला तांत्रिक सुधारणा आणि कारवाई करताना अन्य देशांशी समन्वय जरूरी आहे. सशस्त्र ड्रोनचा सक्रियपणे सामना करण्यासाठी भारतीय नौदलाला अधिक सक्षम भागीदारांच्या साथीने काम करणे आवश्यक आहे.भारतासाठी अमेरिकेच्या नेतृत्वाखालील युतीमध्ये सामील होणे हा एक व्यवहार्य पर्याय आहे. भारतीय नौदल हे अलीकडेच ३९ देशांतील नौदलांचा सहभाग असलेल्या (अमेरिकाप्रणीत) संयुक्त सागरी दलाचे म्हणजे सीएमएफचे पूर्ण सदस्य बनले आहे. या आघाडीचा एक भाग म्हणून भारतीय नौदल लाल समुद्राच्या दक्षिण टोकापासून एडनच्या आखातापर्यंत आणि त्यापलीकडे पसरलेल्या समुद्रमार्गापर्यंत 'सेफ मॅरिटाईम कॉरिडॉर' तयार करण्यात मदत करू शकते. हुतींना इराणचे शस्त्रास्त्रे आणि संपत्तीच्या माध्यमातून पाठबळ आहे. सौदी अरेबियाविरुद्ध येमेनमध्ये वरचष्मा गाजवण्यासाठी इराणने हुतींना सुसज्ज केले. यातून ते शिरजोर बनले. आता ते इराणचेही ऐकत नाहीत.इस्रायल आणि अमेरिका या शत्रूंविरोधात इस्रायली भूमीशिवाय लाल समुद्र, अरेबियन समुद्र, हिंदी महासागरात चाललेले ड्रोन व क्षेपणास्त्रांचे हल्ले जागतिक आणि भारताच्या व्यापार आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने धोकादायक आहेत. भारताचा २० टक्के व्यापार या समुद्रातून होतो. इस्रायलमध्ये नोंदणी झालेल्या 'एमव्ही केम प्लुटो' या रसायनवाहू जहाजावर गुजरातपासून २०० नॉटिकल मैलांवर हल्ला झाला. लाल समुद्रातून मोठ्या प्रमाणात तेलाची वाहतूकही होते. आता तेलवाहू जहाज कंपन्यांनी वाहतुकीवर अतिरिक्त जोखीम मूल्य आकारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर दोन ते पाच टक्क्यांनी वाढले आहेत.भारतीय नौदलाच्या १०० दिवसांच्या संकल्प मोहिमेचा २३ मार्चला समारोप झाला. डिसेंबर २०२३ च्या मध्यावर ही मोहीम सुरू झाली होती. या कालावधीत हिंद महासागरात सागरी सुरक्षेशी संबंधित १८ घटना भारतीय नौदलाने शीघ्र आणि प्रथम प्रतिसाद देत हाताळल्या. इस्रायल-हमास संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय नौदलाने संकल्प अंतर्गत सागरी सुरक्षा मोहिमांची व्याप्ती लक्षणीयरीत्या वाढवली होती. १०० दिवसांत नौदलाची जहाजे, विमाने आणि विशेष दलांनी सागरी सुरक्षेसाठी आणि सागरी सेवेत कार्यरत समुदायाचे विविध अपारंपरिक धोक्यांपासून रक्षण केले.या क्षेत्रातील धोक्यांविषयीच्या माहितीचे आकलन झाल्यानंतर एडनचे आखात आणि लगतचा प्रदेश, अरबी समुद्र तसेच सोमालियाचा पूर्व किनारा अशा तीन भागांत ही संकल्प मोहीम राबविण्यात आली. भारतीय नौदलाच्या या प्रयत्नांमध्ये भारताच्या सागरी हितांचे रक्षण करणे, सागरी धोक्यांचा सामना करणे, नव्याने डोके वर काढणार्या चाचेगिरीला विरोध करणे तसेच भारतीय सागरी क्षेत्रात अमली पदार्थांचा व्यापार लक्षणीयरीत्या कमी करणे अशा कामगिरींचा समावेश आहे; मात्र भारतीय नौदल सदैव तैनात करणे खर्चिक असेल.

# वाढता युद्धज्वर!



सीरियाची राजधानी दमास्कस येथे एक एप्रिल रोजी इराणच्या दूतावासावर हल्ला चढवून इस्रायलने 'इराणी रिव्होल्युशनरी गार्ड'च्या दोन जनरलसह सात अधिका-यांना ठार केले होते. हे कमांडर पॅलेस्टिनी जिहादींना भेटण्यासाठी दमास्कसमध्ये आल्याची माहिती इस्रायलच्या गुप्तचर यंत्रणेला मिळाल्याने हा हल्ला चढविण्यात आल्याचा इस्रायलचा दावा आहे. इस्रायलच्या या हल्ल्याचा बदला घेतला जाईल, असा इशारा इराणने दिला होता व रविवारी रात्री तो अखेर खराही करून दाखविला. इराणने इस्रायलवर ३०० हून अधिक क्षेपणास्त्रे व ड्रोनचा मारा केला. मात्र, यातील ९० टक्के क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट करण्यात यश मिळाल्याचा दावा इस्रायलने केला आहे. शिवाय इराणच्या या हल्ल्यास जोरदार प्रत्युत्तर देण्यात येईल, असेही इस्रायलने जाहीर केले आहे. या नव्या कुरापतींमुळे इस्रायल-हमास युद्धाची व्याप्ती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स या देशांनी इराणचा हल्ला रोखण्याचा क्षीण प्रयत्न केला पण तो मुळातच क्षीण असल्याने अपयशी ठरला. इराणच्या हल्ल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष बायडेन यांनी जी-७ गटातील देशांची तातडीची बैठक बोलवली आहे.मात्र, अशा बैठका व त्या बैठकांद्वारे दिले जाणारे इशारे यातून या देशांना चढलेला युद्धज्वर कमी होण्याची शक्यता नाहीच! अशा बैठकांचा परिणाम झाला असता तर एव्हाना इस्रायल-हमास युद्ध थांबायला हवे होते. मात्र, प्रत्यक्षात या युद्धाचे लोण आता शेजारी राष्ट्रांमध्ये पसरण्याची शक्यता वाढीस लागली आहे. एकीकडे रशिया-युक्रेन युद्ध दोन वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी अद्याप थांबण्याचे नाव घेत नाही. त्यात इस्रायल-हमास युद्धाची भर पडली आहे आणि इराणच्या हल्ल्याने आता या युद्धाची व्याप्ती वाढण्याची धास्ती जगात निर्माण झाली आहे. हमासने इस्रायलवर हल्ला करून या युद्धाला तोंड फोडले हे मान्यच करावे लागेल. हमासच्या या हल्ल्यात १,१३९ इस्रायली मृत्युमुखी पडले, हे ही खरेच! मात्र, त्यानंतर इस्रायलने हमासचा संपूर्ण नायनाट करण्याची घोषणा करून सुरू केलेल्या हल्ल्यांमध्ये आजवर हजारो निरपराध नागरिक ठार झाले आहेत व आजही होतायत! गाझा पट्टीतील रुग्णालयांनाही इस्रायलने हल्ल्यातून सोडले नाही, हे ही तेवढेच खरे आहे. गाझातील नागरिकांना मानवतेच्या दृष्टिकोनातून मदत करणा-यांनाही इस्रायलने लक्ष्य केले आहे. हे युद्ध थांबविण्यात अमेरिकेसह प्रमुख पाश्चिमात्त्य देश व संयुक्त राष्ट्रसंघाला सपशेल अपयश आले आहे, हे ही मान्य करावेच लागेल. त्यात आता इराणची झालेली 'एन्ट्री' जगाच्या डोक्याचा ताप वाढविणारीच ठरणार आहे. पश्चिम आशियातील राजकारणात इराण हा एक अत्यंत महत्त्वाकांक्षी देश आहे.अमेरिका व इस्रायल हे आपले शत्रू असल्याचे इराणने स्पष्टपणे जाहीर करून टाकले आहे.

आयातुल्ला खोमेनी यांच्या नेतृत्वाखाली १९७९ मध्ये झालेल्या धार्मिक क्रांतीनंतर या 'इस्लामिक क्रांती'चे रक्षण करण्यासाठी रिव्होल्युशनरी गार्ड (आयआरजीसी)ची स्थापना करण्यात आली. या पथकातील सैनिकांची बांधीलकी इराणच्या मुख्य लष्कराशी नव्हे तर इराणी धर्मगुरूंशी आहे. आजही इराणचे सैन्य व आयआरजीसीचे जवान समांतर काम करतात. आयआरजीसीकडे एक लाख नव्वद हजार प्रशिक्षित सैनिक आहेत. इराणच्या सर्व सीमांचे रक्षण करण्याबरोबरच संपूर्ण पश्चिम आशियात 'शियापंथीयांचे जाळे' मजबूत करण्याचे काम या सैनिकांवर सोपविण्यात आलेले आहे. पॅलेस्टिनी प्रदेशात हमास, इस्लामिक जिहाद, येमेनमध्ये हैती, लेबनॉनमध्ये हिजबुल्ला अशा गटांशी आयआरजीसीचे लागेबांधे आहेत. प्रामुख्याने छुप्या युद्धाचे दहशतवादी तंत्र ते वापरत आले आहेत. मात्र, आता संघर्षाला गंभीर वळण लागले आहे. युद्धाची व्याप्ती किती वाढू शकते याची कल्पना यावरून येऊ शकते. इस्रायलला रोखण्यासाठी इराण, सीरिया, लेबनॉन हे देश आता उघडपणे पुढे सरसावण्याची शक्यता आहे. तरी त्या सर्वांच्या विरोधात लढायला आपण सज्ज असल्याची गर्जना इस्रायलकडून केली जाते आहे.अर्थात अमेरिकेचा इस्रायलला पाठिंबा असल्याने इस्रायल मागे हटायला तयार नाही, हे उघडच आहे. रशिया-युक्रेन युद्धातही अमेरिकेकडून युक्रेनला अव्याहत शस्त्रपुरवठा सुरूच आहे. त्यातून आपल्या देशातील शस्त्रास्त्र व्यापा-यांचे हित अमेरिका जपते आहे. इराणच्या इस्रायलवरील हल्ल्यानंतर वाढत चाललेला युद्धज्वर कमी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे अमेरिकी प्रशासन सांगत असले तरी प्रत्यक्षात तसे घडताना दिसत नाही. त्यामागे अमेरिकेसारखी राष्ट्रे आपल्या हितसंबंधांचे संकुचित राजकारण पुढे रेटण्याचा जो प्रयत्न करतात ते प्रमुख कारण बनते आहे. त्यातून सगळ्या जगाचे स्थैर्यच धोक्यात येते आहे. रशिया-युक्रेन युद्धाने जे तेलसंकट निर्माण केले आहे त्याने युरोपीय राष्ट्रांसह संपूर्ण जग अगोदरच मेटाकुटीला आले आहे. आता इराणच्या इस्रायल-हमास युद्धातील एन्ट्रीने तेलाच्या तुटवड्याबरोबरच जागतिक व्यापारावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याची झलकही लगेच पहायला मिळाली. होमर्झू सामुद्रधुनीजवळ इस्रायलशी संबंधित मालवाहू जहाजाचे इराणच्या आयआरजीसीने अपहरण केले आहे. या जहाजावर १७ भारतीय नागरिक आहेत. आता या नागरिकांना सोडवण्यासाठी भारताला राजनैतिक प्रयत्न करावे लागत आहेत. या नागरिकांची सुटका करण्यात भारताला यशही मिळेल.मात्र, हा युद्धज्वर कमी न झाल्यास भारतासह अनेक देशांना त्याच्या तीव्र झळा सहन कराव्या लागू शकतात, हेच या घटनेतून स्पष्ट होते. युद्धाचा भडका उडाला तर आधीच अशांत लाल समुद्रामुळे विस्कळीत झालेली युरोप व आखाती देशातील भारताची व्यापारी मालाची वाहतूक खर्चिक होण्याची व त्यामुळे भारताला आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळेच इराणने इस्रायलवर केलेल्या हल्ल्याबाबत भारताने तातडीने चिंता व्यक्त केली आहे व दोन्ही देशांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. मात्र, हा संयम दाखविण्यास कुणी तयार असल्याचे दिसत नाही. इस्रायलने इराणच्या हल्ल्यास प्रत्युत्तर दिले तर इराण इस्रायलवर आणखी हल्ले करेल, असाच कयास व्यक्त केला जातो आहे. गाझा पट्टीतील युद्ध या सर्व परिस्थितीच्या मुळाशी आहे. ते थांबल्याखेरीज ही परिस्थिती सुधारणार नाही. त्यामुळे इस्रायलच्या युद्धज्वरास वेसण घालण्याची खरी गरज आहे. मात्र अशी वेसण कोण घालणार? हाच खरा प्रश्न आहे.

# महागाईचा आगडोंब!

सध्या देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा एक अहवाल समोर आला आहे. त्यात भारतातील महागाई आणि बेरोजगारीच्या मुद्यावर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. एका सर्वेक्षणानुसार देशात महागाई २३ टक्क्यांनी वाढली आहे तर २७ टक्के तरुण बेरोजगारांची वणवण सुरू आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महागाई आणि बेरोजगारी कळीचे मुद्दे ठरणार आहेत. त्यानंतर विकास, हिंदुत्व, राममंदिर यासारख्या गोष्टी लक्षात घेतल्या जातील. महागाई आणि बेरोजगारीच्या मुद्यावर नागरिकांनी मत देताना विचार केला तर भाजप अडचणीत येऊ शकतो. विकास या मुद्याचा भाजपला फायदा होऊ शकतो तसेच हिंदुत्वामुळे २ टक्के तर राम मंदिर मुद्याचा ८ टक्के फायदा होऊ शकतो. सर्वेक्षणात पुढे म्हटले आहे की, देशातील तरुण लोकसंख्येवर बेरोजगारीचा लक्षणीय परिणाम होत आहे.यंदाच्या निवडणुकीत बेरोजगारी, महागाई आणि विकास हे तीन मुद्दे महत्त्वाचे ठरणार आहेत. बेरोजगारी व महागाई हे मुद्दे भाजपला छळणारे ठरतील. नागरिकांना 'विकास' महत्त्वाचा वाटतो. यासाठी भाजपला मतदान मिळू शकते. ग्रामीण भागात मात्र बेरोजगारी व महागाईची भीषण स्थिती आहे.देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढत चालली आहे. गत विधानसभा निवडणुकीत हा महत्त्वाचा विषय होता. अनेक तरुण नोकरीसाठी वणवण भटकत असून त्यांना मनासारखे काम मिळत नाही. मोदींनी निवडणूक प्रचारात या मुद्याकडे दुर्लक्षच केले आहे. त्यांचा भर प्रामुख्याने विकास मुद्यावर आहे. ३२ टक्के लोकांना विकास हा केवळ श्रीमंतांसाठी झाला असे वाटते. सर्वेक्षणातून अनेक बाबी स्पष्ट झाल्या आहेत. मोदी सरकारच्या काळात गत पाच वर्षात भ्रष्टाचार बोकाळल्याचे मत बहुसंख्य नागरिकांनी व्यक्त केले आहे. किमान आधारभूत किमतीच्या हमीबाबत शेतक-यांनी जे आंदोलन सुरू केले आहे ते योग्य असल्याचे मत ६३ टक्के लोकांनी व्यक्त केले आहे तर ११ टक्के लोकांनी हे आंदोलन म्हणजे षडयंत्र असल्याचे म्हटले आहे. यंदा देशात झालेल्या अपु-या पावसामुळे डाळींचे उत्पादन घटले. त्यामुळे एप्रिल महिन्यात डाळींचे भाव गगनाला भिडले. सर्वसामान्यांच्या जेवणातून डाळ गायब होण्याची वेळ आली. राज्यात मार्च महिन्यापासून डाळीचे भाव वाढत आहेत.मार्च महिन्यात तूर डाळीचे घाऊक बाजारातील दर १२० ते १४० रुपये होते. ते आता १४० ते १७० रुपये झाले आहेत. किरकोळ बाजारात हा दर १४० रूपयांवरून १७० ते १९० रुपये प्रतिकिलो झाला आहे. शंभरीच्या आत असलेली मूग डाळ १४० च्या घरात गेली आहे. सरकारने शुक्रवारी किरकोळ महागाईचे दर जाहीर केले. त्यानुसार किरकोळ महागाईचा दर ४.८५ टक्के दाखवण्यात आला आहे. गत दहा महिन्यातील हा निचांक असल्याचे सांगण्यात येते. ही झाली सरकारी आकडेवारी पण प्रत्यक्षात काय? खरचं महागाई कमी झाली का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच असेल. बाजारात गेल्यानंतर जीवनावश्यक वस्तूंचे दर मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसतील. माणसाच्या मूलभूत गरजांपैकी असलेल्या अन्न, वस्त्र, निवा-यापैकी अन्नधान्याची महागाई वाढलेली आहे. तांदूळ, तूरडाळ, मूगडाळ, उडीद डाळ, मसाल्याचे पदार्थ आदींच्या दरात मोठी वाढ झाली आहे. भाज्यांचे दरही ८० ते १०० रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळे किचन बजेट कोलमडले आहे. अन्नधान्य, वाहतुकीचा वाढता खर्च, जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईमुळे प्रत्येकजण मेटाकुटीला आला आहे. जमा व खर्चाची तोंड मिळवणी करताना नाकीनऊ येत आहेत. पैसे कुठे वाचवले जाऊ शकतात हे पाहताना मध्यम वर्गीयांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.कारण येणारा पगार कधी संपतो तेच कळत नाही. त्यामुळे जगायचे कसे हा प्रश्न सा-यांनाच पडला आहे. महागाई कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. त्यात भर पडत आहे ती जागतिक घटनांची. सध्या जागतिक स्तरावर विविध भागात संघर्ष सुरू आहे. रशिया-युक्रेन युद्ध दोन वर्षांहून अधिक काळ सुरू आहे. इस्त्रायल-पॅलेस्टाईन युद्ध सात महिन्यापासून सुरू आहे. त्याचा परिणाम जागतिक खनिज तेलाच्या दरावर झाला आहे. जगातील बहुतांश तेल पुरवठा आखाती देशातून होता. तेलसंपन्न इराण-इस्त्रायल युद्धाला तोंड फुटण्याची शक्यता असल्याने तेल पुरवठा विस्कळीत होण्याची चिन्हे आहेत. त्या भीतीने तेलाचे दर सुमारे ९०.२५ डॉलर प्रति पिंपावर गेले आहेत. त्याचा मोठा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. कारण भारत आपल्या अर्थव्यवस्थेच्या जवळपास ८५ टक्के तेल आयात करतो. तेलाचे दर भडकल्यास त्याचा मोठा परिणाम महागाईवर होऊ शकतो. यंदा हवामान विभागाने उष्णतेच्या लाटांचा इशारा दिला आहे. त्याचा अनुभव सध्या येतोच आहे. त्याचा परिणाम भाज्या, फळांच्या दरावर दिसतो आहे. म्हणजे महागाई कमी होण्याची चिन्हे नाहीत. अमेरिकेत महागाई वाढत आहे.त्यामुळे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेने व्याजदर कपात पुढे ढकलली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेनेही व्याज दर 'जैसे थे' ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भारतातही व्याजदर कमी होण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळे महागाईचा सामना करणा-या सर्वसामान्यांना आणि कर्जदारांच्या गाठीशी चार पैसे बचत करण्याचे योग सध्या तरी दिसत नाहीत. देशात जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईचा दर ५ ते ६टक्के असताना शिक्षण क्षेत्रातही महागाईचा दर वाढला आहे. हा दर सध्या वर्षाला ११ ते १२ टक्के आहे. आगामी काही वर्षात तो दुप्पट होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे ज्युनिअर केजी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण दिवसेंदिवस महाग होत चालले आहे. शाळांच्या फी वाढीवरून पालक व शाळा व्यवस्थापनामध्ये वाद होत आहेत. देशात वैद्यकीय महागाईचा दर १४ टक्क्यांच्या आसपास आहे. आरोग्य हा जनतेचा मुलभूत अधिकार आहे. वैद्यकीय महागाईमुळे आर्थिक परिस्थिती बिघडणार असेल तर सर्वसामान्याने जगायचे कसे? महागाईने होरपळणा-या जनतेला दिलासा देण्यासाठी सरकारने सक्षम पावले उचलणे गरजेचे आहे.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैश्विक मानवी मूल्याचा अंगीकार करावा प्रा. देवदत्त सावंत





लातूर :- विश्वमानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समता, लोकशाही समाजव्यवस्था, सामाजिक न्याय, शिक्षण, त्याग आणि शील या वैश्विक मानवी मूल्याचा अंगीकार केल्यावरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत समाज परिवर्तन आपल्या देशात निर्माण करता येईल असे प्रतिपादन राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्रा. देवदत्त सावंत यांनी केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील एमसीव्हीसी सभागृहामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंती दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत समाज परिवर्तन या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारमंचावर उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, प्रा. कल्याण कांबळे, डॉ. आनंद शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले आणि कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांच्या बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुढे बोलताना प्रा. देवदत्त सावंत म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार होते. भारत हे राष्ट्र व्हावे यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्यभर मोठा संघर्ष केला. समाजात समता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा यासाठी अहोरात्र कष्ट केले असे सांगून कावळा आणि कोल्ह्याची कथा सांगून त्यांनी आपल्या व्याख्यानाचा समारोप केला. यावेळी प्रास्ताविक करताना उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात जगतज्योती महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंत्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये हर्षोल्लासामध्ये आपण साजऱ्या करतो. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करीत आहोत असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे विश्वव्यापी आहे. त्यांनी समाजातील तळागाळातील शोषित, पीडित, गरीब आणि गरजू लोकांच्या कल्याणासाठी सातत्याने अहोरात्र प्रयत्न करून संपूर्ण देशाला एक नवी शैक्षणिक संजीवनी दिली त्यामुळेच त्यांची जयंती ही संपूर्ण विश्वामध्ये विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरी केली जाते. आजच्या व्याख्यानाला कनिष्ठ, वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि समाजकार्य विभागातील विद्यार्थी यांची उपस्थिती अत्यंत महत्त्वपूर्ण आहे असे ते म्हणाले. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दुर्मिळ ग्रंथाचे प्रदर्शनाला सर्व मान्यवरांनी भेट दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंती उत्सव समितीचे प्रमुख प्रा. धोंडीबा भुरे यांनी केले तर आभार डॉ. घनश्याम ताडेवाड यांनी मानले. या कार्यक्रमाला ॲड. सुरेशचंद्र सलगरे, प्रा. प्रशांत उघाडे यांच्यासह कनिष्ठ, वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि समाजकार्य विभागातील विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नामदेव बेंदरगे, रंगनाथ लांडगे, कृष्णा कोळी, बालाजी डावकरे, अशोक शिंदे, योगेश मोदी, राजाभाऊ बोडके, भीमाशंकर सुगरे यांनी परिश्रम घेतले.

## भीम जयंती निमित्त कांदिवली दामू नगर भागात भव्य मिरवणूक

मुंबई/शहामत शेख. दामू नगर भीम नगर नालंदा बुद्ध विहार समिती यांस तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १३३ व्या जयंती अति उत्साहात साजरी करण्यात आली.दामू नगर येथून सायंकाळी सात वाजता भारतररत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची रथात मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक नालंदा बुद्ध विहार दामू नगर येथून ठाकूर व्हिलेज ते लोखंडवाला सर्कल पर्यंत काढण्यात आली.मिरवणुकीत पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून असंख्य बौद्ध युवती व युवक सहभागी झाले. या जयंती उत्साहात पत्रकार संजय बोर्डे उत्सव समितीचे अध्यक्ष पप्पू काळे,नीशांत मोरे एड.लक्ष्मण रेड्डी, बापूराव चव्हाण सयाजी उघडे, रवी हिरवे, विशाल डावरे, उत्तम उघडे, विनायक भगत पत्रकार शहामत शेख एड.उत्तम साबळे, गणेश नरवडे, सचिन केळकर अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच दि.१५एप्रिल रोजी शिवश्री एड.रोशन पाटील यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम सायंकाळी सायं.७ ते १० या वेळेत आयोजन करण्यात आले. यावेळी असंख्य समाज बांधव उपस्थित होते.

## सार्वजनिक शांततेस बाधा आणणारे झोपडपट्टीदादा,गुंड, हातभट्टीवाले, यांचे विरुद्ध लातूर पोलिसांची कडक कारवाईची मोहीम. एम.पी.डी.ए. अंतर्गत जिल्ह्यातील आठवी कारवाई.

लातूर :- *सार्वजनिक शांततेस बाधा आणणारे झोपडपट्टीदादा,गुंड, हातभट्टीवाले, यांचे विरुद्ध लातूर पोलिसांची कडक कारवाईची मोहीम वाढत्या गुन्हेगारीला लगाम लावण्यासाठी तसेच लोकसभा निवडणूक-२०२४ अनुषंगाने पोलिस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांच्या आदेशान्वये शिवाजीनगर ठाण्याच्या पोलिसांनी महाराष्ट्र झोपडपट्टीदादा (एमपीडीए) कायद्यांतर्गत लातूर शहरातील लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड परिसरात राहणारा ओमप्रसाद उर्फ रवी भुजंग कसबे, वय १९ वर्ष याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाईचा शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणार्या गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी व त्यांची गुन्हेगारी रोखण्यासाठी लातूर पोलिसांकडून कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. ओमप्रसाद उर्फ रवी भुजंग कसबे याला 'एमपीडीए' कायद्याखाली एक वर्षासाठी स्थानबद्ध करुन त्याची रवानगी लातूर कारागृहात करण्यात आली आहे. पोलीस अधिक्षक श्री. सोमय मुंडे यांच्या कार्यकाळात जिल्ह्यातील एमपीडीए नुसार करण्यात आलेली ही आठवी कारवाई आहे.

कुख्यात गुन्हेगार ओमप्रसाद उर्फ रवी भुजंग कसबे, याच्या विरुद्ध जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यामध्ये अत्यंत गंभीर स्वरूपाचे एकूण ०८ गुन्ह्यांची नोंद असून त्यामध्ये शस्त्रासह शरीराविरुद्ध, जबरीने मालमत्ता चोरी करण्याचे गुन्हे, मालमत्ता चोरीचे गुन्हे ,भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे, असे एकूण ०८ गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत.

जनसामान्यात त्याची भीती होती. त्याच्याकडून सार्वजनिक शांततेस धोका असल्याने पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे निर्देशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी,(लातूर शहर) भागवत फुंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले, पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस निरीक्षक दिलीप सागर, यांचे मार्गदर्शनात शिवाजीनगर पोलिस स्टेशन चे सपोनी विशाल शहाणे, पोलिस उपनिरीक्षक नीळकंठ, पोलिस अंमलदार विजय पाटील , संतोष खांडेकर, यूवराज गिरी, मुन्ना मदने, बालाजी कोतवाड , काका बोचरे यांनी परिश्रम घेवून प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी यांचे कडे मंजूरी साठी पाठविला होता. व मंजुरी नंतर त्याची अंमलबजावणी केली आहे.

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर वर्षा ठाकूर घुगे यांनी त्याच्या स्थानबद्धतेचा प्रस्ताव मंजूर केला आहे. त्यावरून सदर आरोपीची १५ एप्रिल रोजी लातूर कारागृहामध्ये रवानगी करण्यात आली आहे.

काय आहे एमपीडीए कायदा?

महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ,पायरसी) वाळू तस्कर व अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे गुन्हेगार यांच्या विघातक कृतींना प्रतिबंध करण्याविषयीचा कायदा सन १९८१ (सुधारणा १९९६, २००९ व २०१५) अंतर्गत स्थानबद्धतेचा आदेश म्हणजेच एमपीडीए (महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डेंजरस ॲक्टिविटी) होय. सराईत गुन्हेगार किंवा सातत्याने सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था भंग करणार्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध एमपीडीएची कारवाई करता येते. या कायद्यानुसार सराईत गुन्हेगाराला एक वर्षासाठी कारागृहात स्थानबद्ध करण्यात येते.

सतत गुन्हेगारी कृत्य करणारे गुंड प्रवृत्तीच्या विरुद्ध एमपीडीए (महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ डेंजरस ॲक्टिविटी) सारख्या कठोर कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येत असून यानंतरही लातूर जिल्ह्यातील गुंडगिरी व भाईगिरी वृत्तीचा समूळ उच्चाटन करण्यासाठी समाजविघातक प्रवृत्तींना आळा घालण्याकरिता सदरची कार्यवाही करण्यात येणार असून लातूर पोलीस कडून जिल्ह्यातील धोकादायक गुंड व गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद असलेल्या कुख्यात इसमांची माहिती संकलित करण्यात येत आहे.

# चारशे पार भाजपाचा नव्हे, देशातील जनतेचा नारा लातूर ग्रामीणमधून सर्वाधिक मताधिक्य मिळावे

## लातूर ग्रामीण विधानसभा महायुतीच्या मेळाव्यात ना. संजय बनसोडे यांचे आवाहन



लातूर :- पंतप्रधान नरेंद्रजी मोदी देशाला महासत्तेकडे घेवून जाण्याचे काम करीत आहेत. गेल्या दहा वर्षात देशहितासाठी आणि देशभरातील जनतेच्या विकासासाठी केलेल्या कामामुळे 'चारशे पार' हा जनतेचा आवाज झाला आहे. चारशे पार भाजपाचा नव्हे तर जनतेचा नारा असून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना जिल्हयात सर्वाधिक मताधिक्य मिळावे यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी प्रचार यंत्रणा गतीमान करावी असे आवाहन राज्याचे युवक कल्याण व क्रिडामंत्री ना. संजय बनसोडे यांनी लातूर येथील महायुतीच्या मेळाव्यात बोलताना केले. लातूर लोकसभा मतदार संघातील भाजपा महायुतीच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई, रासप व मित्रपक्ष महायुतीचा मेळावा भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार रोजी लातूर येथील गिरवलकर मंगल कार्यालयात पार पडला. या मेळाव्यास राज्याचे युवक कल्याण व क्रिडा मंत्री ना. संजय बनसोडे, महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, जिल्हयाचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, शिक्षक आमदार विक्रम काळे, किसान मोर्चाचे राष्ट्रीय कार्यकारीणी सदस्य शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजी आमदार गोविंदअण्णा केंद्रे, बब्रुवान खंदाडे, भाजपा नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, लातूर लोकसभा निवडणूक प्रभारी प्रा. किरण पाटील, शिवसेना संपर्क प्रमुख ॲड. बळवंत जाधव, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. व्यंकटराव बेद्रे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, लोकसभा निवडणूक प्रमुख राहूल केंद्रे, माजी सभापती अशोककाका केंद्रे, किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, शिवसेना जिल्हा प्रमुख ॲड. शिवाजीराव माने, जिल्हा प्रमुख गोपाळ माने, युवा जिल्हा प्रमुख कुलदिप सुर्यवंशी, भागवत सोट,राजकुमार सुरवसे, सदाशिव गव्हाणे, रिपाईचे धम्मानंद घोडके, विजयकुमार गायकवाड, राष्ट्रवादीचे विनोद अंबेकर, गणेश माडजे, महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, बन्सी भिसे, अभिषेक आकनगिरे, सतिश अंबेकर यांच्यासह महायुतीच्या अनेक मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यास मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी कॉग्रेस, रिपाई, रासप व मित्रपक्ष महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी हजारोंच्या संखेनी उपस्थित होती. देश का नेता कैसा हो, नरेंद्र मोदी जैसा हो, अब की बार चारसो पार, फिर एक बार मोदी सरकार, महायुतीचा विजय असो अशा विविध घोषणांनी सभागृह दणानूण सोडले होते. या महायुतीच्या मेळाव्यात मोठे उत्साहाचे वातावरण होते. लातूर जिल्हयातील सर्व विधानसभेत महायुतीच्या मेळाव्याला मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे सांगून ना. संजय बनसोडे म्हणाले की, लातूर ग्रामीण मतदार संघात प्रस्तापिताविरुध्द लढाई होत असतानाही महायुतीच्या मेळाव्याला मिळालेला मोठा प्रतिसाद हीच आ. रमेशअप्पा कराड यांच्या कार्याची पावती आहे. आप्पांनी मतदार संघात गावागावाचा आणि जनतेचा विकास झाला पाहीजे यासाठी सतत विविध खात्याच्या मंत्र्याकडे आग्रह धरुन शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून लाखो नव्हे तर कोटयावधीचा निधी मतदार संघात खेचून आणला असल्याचे बोलून दाखविले. विकसीत भारत करण्याचे स्वप्न नरेंद्रजी मोदी यांचे आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबुत करण्यासाठी जिद्दीने काम करीत आहेत. मोदीजींच्या नेतृत्वात नितीनजी गडकरी यांनी राज्यातच नव्हे तर देशभर रस्ते बांधणीच्या कामात क्रांती केली. देशहितासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी मोदीजी तिसऱ्यांदा पंतप्रधान होणे काळाची गरज असल्याने महायुतीच्या कार्यकर्त्यांनी पायाला भिंगरी बांधून सुधाकर शृंगारे यांना बहुमतांनी विजयी करण्यासाठी मेहनत घ्यावी असेही आवाहन ना. संजय बनसोडे यांनी केले. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाच्या माध्यमातून लातूर जिल्हयात रेल्वे बोगी निर्मितीचा कारखाना उभा राहीला, सिमेंट रस्त्याचे जाळे निर्माण झाले. अनेक विकास कामांना गती मिळाली. येत्या काळात लातूरला हक्काचे पिण्यासाठी, शेतीसाठी पाणी मिळावे आणि केंद्रीय विद्यापीठ कार्यान्वीत व्हावे यासाठी प्रयत्नशील आहोत असे सांगून आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, सर्वांना सन्मानाने बोलणारे सुधाकर शृंगारे खासदार झाले म्हणून कधीच हवेत गेले नाहीत, त्यांचे पाय जमीनीवरच आहेत. सर्व सण, उत्सव आणि महापुरुषांची भव्य दिव्य जयंती साजरी केली. मराठवाड्यात सर्वाधिक मतांनी शृंगारे निवडूण येणार असल्याचे त्यांनी बोलून दाखविले. लोकसभा निवडणूकीच्या माध्यमातून गेल्या १५ दिवसांत पावसाळ्यातील छत्रीप्रमाणे कॉग्रेस गावागावात दिसत आहे. हे लोक पाच वर्षे कुठे होते असा प्रश्न उपस्थित करुन आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, गरीबी हटावचा नारा देवून सर्वाधिक काळ सत्ता उपभोगणाऱ्या कॉग्रेसने गरीबांची गरीबी हटवीली नाही मात्र पुढाऱ्यांच्या परिवाराचे हीत साधले. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी गोरगरीब माणसाला केंद्रबिंदू मानून अनेक योजना सुरु केल्या. त्याचा प्रत्यक्ष लाभ दिला. लातूर ग्रामीण मतदार संघात गेल्या १५ वर्षापासून कॉग्रेसचा आमदार आहे. त्यांनी १५ वर्षात केलेल्या कामापेक्षा आमदार म्हणून मी ३ वर्षात केलेली कामे कीतीतरी पटीने अधिक आहेत. साखर कारखान्याच्या माध्यमातून राजकारण करणाऱ्या सहकार महर्षी यांनी यावर्षी शेतक-यांचा ऊस वाळविण्याचे पाप केले, मागील वर्षाचे अनेक शेतकऱ्यांचे अद्याप ऊस बिले दिले नाही याची आठवण करुन दिली. महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे कमी बोलणारे अधिक काम करणारे कार्यक्षम आहेत. मोदीजींच्या कामांना समर्थन देण्यासाठी सुधाकर शृंगारे यांना लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून किमान पन्नास हजाराचे मताधिक्य मिळावे यासाठी भाजपासह महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घ्यावी. आजपासून कामाला लागावे असेही आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे. गेल्या पाच वर्षात नरेंद्रजी मोदी यांनी अनेक ऐतिहासीक निर्णय घेतले. महत्वपुर्ण विधेयक मंजूर झाले. या सर्व विधेयकाला आपला प्रतिनिधी म्हणून मला समर्थन देता आले असे सांगून खा. सुधाकर शृंगारे यांनी केंद्र शासनाने सुरु केलेल्या विविध कल्याणकारी योजनेबरोबरच जिल्हयात केलेल्या विविध कामाची माहिती दिली. भाजपा देशाची घटना बदलणार, संविधान बचाव असे कॉग्रेसवाले बोलत आहेत. याचा खरपूस समाचार घेताना १९७५ साली इंदिरा गांधीनीच आणिबाणी लागू करुन संविधानाची पायमल्ली केली होती हे कदापी विसरता येणार नाही. नरेंद्र मोदी संविधान हा देशाचा ग्रंथ समजून काम करतात असेही शृंगारे यांनी बोलून दाखविले. या महायुतीच्या मेळाव्यात आ. विक्रम काळे, शिवाजीराव पाटील कव्हेकर, बब्रूवान खंदाडे, दिलीपराव देशमुख, ॲड. बळवंत जाधव, ॲड. व्यंकटराव बेद्रे, अर्चनाताई पाटील चाकूरकर, गोपाळराव माने, ऋषिकेश कराड, धम्मानंद घोडके, कुलदिप सुर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवरांनी नरेंद्रजी मोदी यांच्या कार्याचे कौतूक करुन कॉग्रेस आघाडीच्या कारभारावर टिका केली व खा. सुधाकर शृंगारे यांनाच बहुमतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. प्रारंभी ॲड. दशरथ सरवदे यांनी मेळाव्याचे प्रास्ताविक केले, कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी भागवत सोट यांनी आभार मानले.

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात लोकशाही प्रगल्भ करणाऱ्या महामानवाची जयंती साजरी

नवी मुंबई :- नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय कळंबोली येथील शासकीय इमारतीच्या आवारात महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ व्या जयंतीनिमित्त लोकशाही प्रगल्भ करणारे महामानव सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज. महात्मा ज्योतिबा फुले. राजश्री शाहू महाराज यांची संयुक्त जयंती मोठ्या जल्लोसात व थाटात साजरी करण्यात आली सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री संजय कुमार पाटील साहेब (पोलीस उपायुक्त मुख्यालय नवी मुंबई) मा. श्री धर्मपाल बनसोडे (सहाय्यक पोलीस आयुक्त मु. प्र. नवी मुंबई) मा. श्री शांताराम बबन वाघमोडे (राखीव पोलीस निरीक्षक मु. नवी मुंबई) एड. पल्लवी राजपक्ष (सामाजिक कार्यकर्त्या) हजर होते.

राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी, साहित्यिक, विचारवंत श्री उत्तम दासु तरकसे यांचा नुकताच प्रकाशित झालेल्या शाहीची नोंद या काव्यसंग्रहाला नागपूर येथून जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचा पद्मश्री दया पवार पुरस्कार मिळाल्याने श्री पाटील साहेब यांच्या हास्ते सत्कार व सन्मान करण्यात आला .

तसेच सदर कार्यक्रमात श्री पाटील साहेब यांनी आपले विचार मांडताना सर्व पोलीस बांधवांनी वाचन केलं पाहिजे किमान महिन्यात एक तरी पुस्तक वाचले पाहिजे तसेच आपल्या देशाचे संविधान हे सर्व जगात उत्कृष्ट असे संविधान आहे समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय हक्काची जाणीव असण्या करिता संविधानाचे ज्ञान असणे गरजेचे आहे त्याही उपरोक्त संविधान हे प्रत्येकाच्या घरात ग्रंथरूपाने असायला हवे असे तसेच माझेही वाचन कमी झाले आहे पण आज पासून मी पुस्तक वाचनाचा संकल्प करतो व आपल्या आयुक्तालयाची लायब्ररी सुसज्ज करून नामावंत साहित्यिकांचे पुस्तक उपलब्ध करून देण्याचे ह्मी देत मोलाचे मार्गदर्शन केले





तसेच श्री उत्तम दा. तरकसे यांनी सत्काराचे उत्तरदायित्वाचे पालन करत आपले विचार मांडताना प्रत्येक भारतीय नागरिकास स्वातंत्रपणे, स्वाभिमानाने जगण्याचा न्याय हक्क संविधानाने प्रदान केला आहे .आपल्या देशाची लोकशाही प्रगल्भ व सर्वश्रेष्ठ आहे असे मोलाचे विचार मांडले तसेच मनोज राजपक्षे यांनी सुद्धा धम्मा बाबतचे तत्व आपल्या विचारात मांडले , राजश्री पांडव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात व कायद्यातून महिलांना दिलेल्या अधिकाराबद्दल जाणीव करून दिली व प्रत्येक भारतीय महिलेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आभार न मानता त्यांच्या ऋणातच राहावे असे आपले मत मांडले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका शुक्ला मॅडम यांनी खूपच सुंदर प्रकारे केले असून कार्यक्रमास बहुसंख्य पोलीस बांधवनी आपल्या परिवारासह हजर राहून कार्यक्रमाचे शोभा वाढवली

कार्यक्रमचे आयोजिक नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस बांधव यांचे आभार तसेच कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुणेचे व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

---

# बीआरएसची अंम्बेसिडर आली जोरात; पण वर्षभरातच कोमात?

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) सीमावर्ती तेलंगणातील भारत राष्ट्र समितीने (बीआरएस) एक वर्षभरापूर्वी किनवट तालुक्यात जोरात एन्ट्री केली होती. पण, या लोकसभा निवडणुकीत हा पक्ष कोमात गेल्याची सध्याची स्थिती आहे. या पक्षातील पदाधिकाऱ्यांची- कार्यकर्त्यांची अवस्था 'ना इधर ना उधर, बिचमें अधर' अशी झाली आहे. बीआरएसचे माजी खासदार नागेश घोडाम यांनी स्वतः किनवट तालुक्यातील अनेक सीमावर्ती गावांना भेटी दिल्या होत्या, पण ते आता खुद्द लोकसभा निवडणुकीत भाजपवासी झाल्याने बीआरएस कोमात गेली आहे. जानेवारी २०२३ मध्ये या तालुक्यात बीआरएसचा झंझावात पाहता, अनेकांना जिल्हा परिषद व पंचायत समितीचे डोहाळे लागले होते. पक्ष बदलणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांनी त्यावेळी बीआरएसचे पक्ष संघटनया काळात बीआरएसची एन्ट्री कोणत्या पक्षाच्या पथ्यावर पडेल? हे पाहण्याआधीच तेलंग- णातील विधानसभा निवडणुकीत बीआरएस पक्ष पराभूत झाला. त्यानंतर किनवट तालुक्यात बीआरएसचे संघटन पार कोमात गेले. वाढविण्यासाठी प्रयत्नही केले. पण पक्ष संघटन टिकले नसल्याने व बीआरएस आली तशी परत गेली, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.तेलंगणा राज्याचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी त्यांचा भारत राष्ट्र ४ समिती पक्ष देशपातळीवर काम क करणार असून त्याची सुरुवात जानेवारी २०२३ मध्ये नांदेड जिल्ह्यापासून केली. व त्यात सीमावर्ती किनवट तालुक्याचा समावेश होता, त्यावेळच्या आजी-माजी लोकप्रतिनिधींनी सीमावर्ती भागात भेटीगाठी घेतल्या आणि जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका ताकदीने लढवण्याची तयारी त्यावेळी दर्शवली होती. सर्वच पक्षांनी धसकाही घेतला होता. स्थानिक गावकरी, विविध संघटनांशी चर्चा करून पक्षाचे ध्येय धोरण पटवून देण्याचा प्रयत्न केला. वाटले होते हा पक्ष सर्वच पक्षाला नाकीनऊ आणेल; पण त्याआधीच तो कोमात गेला आहे. पक्ष बदलून आलेल्या नेते कार्यकर्त्यांची चलबिचल झाली आहे. त्या नेते कार्यकर्त्यांची अवस्था म्हणजे 'इधर ना उधर बिच मे अधर, कोणता झेंडा घेऊ हाती? अशी झाली आहे.

# लातूर जिल्ह्यात आक्षेपार्ह गाणी वाजविण्यास मनाई

लातूर :- लातूर जिल्ह्यात 'हर टोपीवाला भी सर झुकाके जय श्रीराम बोलेगा' 'मंदिर वही बनायेंगे', 'तेरे मक्का और मदिना में शिव का डंका बजता है', 'दूर हटाओ अल्ला वालो' सारखी आक्षेपार्ह गाणी किंवा इतर आक्षेपार्ह गाणी सार्वजनिक ठिकाणी वाजविणे, त्या गाण्याची सीडी, कॅसेट सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करणे व ताब्यात ठेवणाऱ्यावर श्रीरामनवमी सणानिमित मिरवणुकीमध्ये बंदी घालण्यात आली आहे. जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

धार्मीक व सामाजिक शांततेला बाधित करणारे कोणतेही कृत्य करण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध करण्यात आला आहे. संपुर्ण जिल्हाभर फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) ची अधिसूचना लागू करण्यात आली. हे आदेश १७ एप्रिल, २०२४ चे ००.०१ वाजता पासून ते १७ एप्रिल, २०२४ चे या २४.०० वाजेपर्यंत लागू राहतील, असे आदेशात नमूद करण्यात आले .

# भारतीय नागरिकांना स्वतंत्रपणे स्वाभिमानाने जगण्याचा हक्क संविधानाने प्रदान केला - उत्तम तरकसे



खारघर सेक्टर ११ मधील साई शास्त्र सोसायटीच्या आवारात एक सेक्टर एक जयंती या उपक्रमांतर्गत विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती सह लोकशाहीस प्रकल्प करणाऱ्या महामानवांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गुरुनाथ ठाकूर (मा.नगरसेवक) लीना गरड (मा. नगरसेवक) एड कांबळे व राज्य शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी-साहित्यिक. विचारवंत उत्तम दा. तरकसे* हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हजर राहून आपले विचार मांडताना त्यांनी बुद्ध धर्माचे व संघाचे तसेच स्त्रीशरण पंचशील चे विवेचन करत भारताचे संविधान म्हणजे सर्व भारतीय नागरिकास स्वातंत्रपणे जगण्याचा हक्क प्रदान करणारी जगातील सर्वश्रेष्ठ अशी राज्यघटना म्हणजे ती भारतीय राज्यघटना आहे असे आपले मोलाचे विचार मांडून उपस्थितांना मार्गदर्शन केले

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मंगेश गवारे यांनी उत्तम प्रकारे केले कार्यक्रमास वसंत थोरात. संदेश खरात,मोहिते काका, विलास भोर, दीपक भुजबळ, श्रीकांत ढवळे, हिरवे गुरुजी, तांबे वाघ मोरे. यांनी अहोरात्र मेहनत घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवल्याने व उपस्थित प्रमुख पाहुणे व प्रेक्षक वर्गाने भरभरून दात देत पूर्ण परिसर खचाखच भरल्याने सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची राष्ट्रगीताने सांगता करण्यात आले

---

# पक्षाची विजयी पताका घेवून उमेदवाराच्या पाठीशी रहा : आ. संभाजी पाटील निलंगेकर

लातूर/प्रतिनिधी : लातूर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांचा विजय निश्चित आहे. पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विजयी पताका घेवून उमेदवाराच्या पाठीशी रहावे, असे आवाहन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले. आ. निलंगेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर शहर मतदारसंघातील सिध्देश्वर मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंडळ, महात्मा बसवेश्वर मंडळ, छत्रपती शिवाजी महाराज मंडळ, दयानंद सरस्वती मंडळ, पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर मंडळतील बुथ प्रमुखांच्या बैठका संपन्न झाल्या.



या बैठकांना मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर बोलत होते. या बैठकांना डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर, लोकसभा प्रभारी किरण पाटील, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, शहर विधानसभा प्रमुख गुरुनाथ मगे, प्रदेश उपाध्यक्ष अजीत पाटील कव्हेकर, प्रदेश प्रवक्त्या प्रेरणाताई होनराव, महिला आघाडी शहराध्यक्षा रागिनी यादव, लोकसभा विस्तारक सिध्देश्वर पवार, सुधीर धुत्तेकर, ॲड. शैलेश गोजमगुंडे, ॲड. दिपक मठपती, ॲड. दिग्वीजय काथवटे, मंडल अध्यक्षा शोभाताई पाटील, मिनाताई गायकवाड, माजी नगरसेवक अनंत गायकवाड, सुनिल मलवाड, संगीत रंदाळे, मिनाताई भोसले, सुनील होनराव, प्रदीप मोरे, सुरेश राठोड, दिलीप धोत्रे, श्रीधर सोनटक्के, अरविंद शिंदे, विकास पाचपिडे, महेश महाले, पांडुरंग पवार, सुधाकर दोडके आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर म्हणाले की, आता भाजपाचा काळ संपला आहे. प्रत्येक बुथवर बैठका घेतल्या जात आहेत. मी स्वतः जिल्ह्यातील प्रत्येक बुथवर जात आहे. लातूर मतदारसंघात आजही भाजपाचेच वर्चस्व आहे. ते आपल्याला मतदानातून दाखवून द्यायचे आहे. आपले उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांना लातूर शहर मतदारसंघातून सर्वाधिक मताधिक्य मिळेल याची मला खात्री आहे. बुथप्रमुख हेच पक्षाचे स्टार प्रचारक आहेत. त्यांच्या पाठबळावरच आपले उमेदवार गतवेळपेक्षा अधिक मताधिक्याने विजयी होतील असेही आ. निलंगेकर यांनी यावेळी सांगितले. खा. सुधाकर श्रृंगारे यांचा उमेदवारी अर्ज भरताना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# आमची अडचण असेल, तर वाजवा 'तुतारी'!

अहमदनगर : प्रतिनिधी नगर लोकसभा मतदारसंघात आज एक खळबळजनक किस्सा घडला. पाथर्डी येथील बुथ कमिट्यांच्या बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना भाजपचे लोकसभा उमेदवार सुजय विखे पाटील यांनी सर्वांच्या भुवया उंचावणारे वक्तव्य केले. आमची सर्वांची आणि मोदींची अडचण होत असेल तर तुतारी वाजून टाका, असे प्रतिपादन सुजय विखे यांनी केले.भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना त्यांचे समाजातील बोलण्याचे महत्व पटवून देताना विखेंनी वरील उपरोधिक वक्तव्य केले आहे. तुम्ही सगळेजण; आम्ही तुमच्या जीवावर राजकारण करतो. आज भाजपचा कार्यकर्ता समाजात वावरत असताना काय बोलतो याला खूप महत्व आहे. तुम्हाला याची जाणीव नसेल, असे विखे म्हणाले.काही लोकांना सुजय विखे मान्य नसेल तर मोदींचे नाव सांगा, आमची दोघांची अडचण असेल तर ताईंचे नाव सांगा. तिघांची अडचण असेल तर मुंडेंचे नाव सांगा असे म्हणत शेवटी त्यांनी आमची सर्वांची अडचण असेल तर 'तुतारी' वाजून टाका म्हणत भर व्यासपीठावरून हात जोडले. यावेळी एका कार्यकर्त्याने आम्हाला राहुल गांधी यांना पंतप्रधान करायचे नाहीय, असे ठणकावून सांगितले.

---

# कारखाने उभारले तरच मिळेल रोजगार. 'एमआयडीसी' ला चालना मिळणार तरी कधी?

किनवट.ता.प्रतिनिधी. (शोख शौकत) किनवट येथे राष्ट्रीय महामार्गावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विकास केंद्र अ इनसतानाही येथील औद्योगिक विकास महामंडळाचा (एमआयडीसी) विकास झाला नाही. ५४.५४ हेक्टर क्षेत्रावर असलेल्या एमआयडीसीला चालना न मिळाल्याने चक्क मोकळ्या जागेत एमआयडीसी असल्याचे पाहावयास मिळत आहे. उद्योजकच फिरकायला तयार नसल्याचे चित्र आहे. किनवट येथे लघु व मोठ्या उद्योजकाला वाव आहे. या ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे ट्रॅक असल्याने अनेक छोटे-मोठे कारखाने उभारायला संधी आहे. एमआयडीसीचे कोनशिला भूमिपूजन होऊन ३२ वर्षे लोटत असतानाही या जागेवर उद्योग सुरू झाले नाहीत. येथे कारखाने उभारले गेले तर कोठारी, प्रधानसांगवी, गोकुंदा या गावांचा विकास होईल. बेरोजगारांना रोजगार मिळू शकेल. रस्ते विकास, सिमेंट कॉँक्रीट, नाली बांधकाम, सिमेंट कॉँक्रीट रस्ते हीच मार्जिनची कामे केली जात आहेत. पण, रोजगाराची संधी काही उपलब्ध करुन दिली गेली नाही. हे दुर्दैवच म्हणावे लागेल. तालुक्याचे कापूस हे मुख्य पीक असून, कापसाचे उत्पन्न मिळाल्यानंतर शेतात असणाऱ्या पराट्यावर प्रक्रिया उद्योग केला आणि त्या आधारावर कारखाना




निर्माण झाला तर प्लायवूडचा कारखाना तयार होऊ शकतो. एवढेच नाही तर किनवट तालुक्यात जंगल मोठ्या प्रमाणावर असल्याने जंगलात बांबू मोठ्या प्रमाणावर आहे. बांबूपासून कागद तयार करणारा कारखाना उभा राहू शकतो. या एमआयडीसीतील साठ टक्के प्लॉट गेले आहे. पण, औद्योगिक विकास काही झाला नाही. आता औद्योगिक विकास महामंडळ यांची नवीन पॉलिसी आली आहे. पूर्वी वीस टक्के बांधकाम करणे कम्पल्सरी होते. आता त्यात भर पडत चाळीस टक्के बांधकाम करणे बंधनकारक आहे. उद्योग सुरु करायचा झाला तर बांधकामाला पैसा लागतो. उद्योग कसा निर्माण करायचा ? एकहजारस्क्वेअरफूटजागेवर४००फूटबांधकामनव्यानियमामुळेकरावे. लागणार आहे. ते उद्योगांना परवडणारे नाही. लोक प्लॉट घेतात, पण विकास करत नाहीत. त्यामुळे आता पाच वर्षात विकास केला नाही. तर तो प्लॉट परत घेण्याची नव्याने तरतूद करण्यात आल्याने आता विकासाला चालना मिळेल का? हे काळच सांगेल. सध्या एक जितिय फॅक्टरी इंडस्टीन्त अन्य दोन बांधकामे करण्यात आली आहेत. बाकी सर्व जमीन मोकळी आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE